# जाहिर आवाहन

**जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत गट-क अंतर्गत विविध संवर्गाची पदभरती करीता ऑनलाईन शुल्क भरणा करणे बाबत.**

जिल्हा परिषदेकडील पदांच्या भरतीसाठी अनेक विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरणे शिल्लक असल्याचे ग्रामविकास विभागाच्या निदर्शनास आल्याने उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरणेकरीता दिनांक २३/०४/२०१९ (११.५९pm) पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

उक्त बाबत दैनिक महाराष्ट्र टाईम्स(राज्यस्तर),दैनिक लोकमत(जिल्हास्तर),दैनिक पुण्यनगरी (जिल्हास्तर) या वर्तमान पत्रांमध्ये दिनांक १७/०४/२०१९ रोजी शुध्दीपत्रकास प्रसिध्दी देण्यात आली आहे.तथापि उमेदवारांच्या ऑनलाईन अर्जाच्या नोंदणी बाबत ग्रामविकास विभागाने दि.१८/०४/२०१९ रोजी आढावा घेतला असता दिनांक १६/०४/२०१९ च्या तुलनेत ऑनलाईन अर्ज केलेल्या अर्जाची फी भरण्याचा वेग लक्षणीसदृष्ट्या मंदावलेला असल्याचे आढळून आलेले आहे. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी दिनांक २३/०४/२०१९(११.५९pm) ही अंतिम मुदत असून ज्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता नोंदणी केली आहे तथापि अद्याप अर्जावरील फी ची रक्कम भरलेली नाही अशा सर्व उमेदवारांना अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकाची वाट न पाहाता लवकारात लवकर फी ची रक्कम भरणा करणे बाबत आवाहन करणेत येत आहे.

तथापि याद्वारे सर्व उमेदवारांना आवाहन करणेत येते की,अर्ज भरणेची अंतिम मुदत दिनांक २३/०४/२०१९(११.५९pm) ही अंतिम मुदत असून त्यानंतर कोणतीही मुदतवाढ दीली जाणार नसल्याने ज्या उमेदवारांनी अर्ज दाखल केला आहे परंतु परिक्षा शुल्क ऑनलाईन भरला नाही अशा सर्व उमेदवारांनी अंतिम दिनांकाची वाट न पाहाता तात्काळ परिक्षा शुल्क भरना करुन ऑलनाईन अर्ज दाखल करावा.

**स्वाक्षरीत /-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,नाशिक**